# संत चोखामेळा यांच्या निवडक ओव्यातील सामाजिक दृष्टीकोन : एक अभ्यास

**प्रा.रोशन शंकर भोवते**
स्व. निर्धन पाटील वाघाये कला व विज्ञान महाविद्यालय सौदंड. जि. गोंदिया
Email - roshanbhowate07@gmail.com
मो. नं. 9421811958

---

**प्रस्तावना :**

संत चोखामेळा हे संत मंडळीतील थोर संत. 'वैकुंठ पंढरी भिवरेचे तीरी ! प्रत्यक्ष श्रीहरी उभा तेथे !! असे सुंदर विठ्ठलवर्णन करणारे संत. चोखामेळा यादवकालीन असुन संत नामदेवाचे समकालीन होते. त्यांनी नामदेवाचा व ज्ञानदेव भावंडाचा उल्लेख आपल्या अभंगात केला आहे.

तेराव्या शतकात महाराष्ट्रात सांस्कृतिक चळवळीचा जन्म झाला. प्राप्त परिस्थितीला अनुसरून चोखाबांनी समाजाला नवे विचार दिले. क्षुद्र देवतांचे पुजन, वर्ण विषमता आणि धार्मिक कर्मकांडात समाजातील सामान्य माणसाला वाव नव्हता. अशावेळी स्वधर्म, सामाजिक निती आणि जातिभेदातीत मानवतेची शिकवण देऊन आध्यात्मिक आणि सामाजिक लोकशाहीचा पाया घातला गेला. संत चोखोबा म्हणतात 'नदी डोंगा परी निर नव्हे डोंगा ! काय भुललासी वरलीया रंगा !! असे परखड विचार मांडून सामाजिक दृष्टीकोन जागृत केला.

**शोध निबंधाचा उद्देश :**

संत चोखामेळा यांच्या ओव्यातील सामाजिक कार्याचा आढावा घेवून अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत जगतांना येणाऱ्या सामाजिक अनुभवाचे दर्शन घेणे अभंगातील प्रभावीपणा व परखडपणा याची सांगड घालून सामाजिक ज्ञान समाजाभिमुख करणे हे चिकित्सक अध्ययनाचे उद्दिष्ट आहे.

**संत चोखामेळा परिचय व अंतकाळ :**

संत चोखामेळा ज्ञानेश्वराच्या प्रभावळीतील एक संत. त्यांच्या जन्मकाळाची नोंद निश्चित कळत नाही. काही अभ्यासकाच्या मते त्यांचा जन्म वऱ्हाडातील बुलढाणा जिल्हयातील देऊळगाव राजा तालुक्यात मेहूणपूरी येथे झाल्याचे सांगतात, काही महिपती पंढरीला. तर काही सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा येथे असल्याचे सांगतात यावरून जन्मकाळ स्पष्ट होतांना दिसत नाही. त्यांच्या नावावर 'विवेकदर्पण' हे एक प्रकरण आढळते. 'सकलसंत गाथे' त एकूण ३४९ अभंगाची नोंद आहे. त्यांचा संपूर्ण परिवार त्यात सोयराबाई (पत्नी), बंका (मेहूणा), निर्मला (धाकटी बहीन) कर्ममेळा (मुलगा) यांनी संत चोखामेळयाच्या सहवासात राहून विठ्ठलभक्तीचा महिमा गायला व समाज कार्यासाठी अनेक अभंगाची निर्मिती केली. दलितांच्या दु:खाला वाचा फोडणारे पहिले दलितकवी म्हणून चोखोबांचे नाव घेतले जाते. अशा महान संताचा अंतकाळ इ.स.१३३८ मध्ये झाला.

**अध्यात्मातून सामाजिकतेकडे :**

संत चोखामेळा यांनी विठ्ठलभक्तीचे गोडवे अभंगात गातांना स्वत: अंत:मुख होतात. टाळी वाजवावी गुढी उभारावी ! वाट ते चालावी पंढरीची !! आपल्या जिवनातील सत्य लोकांपूढे मांडून ते सांगतात की पंढरीची वाट चालत असतांना टाळी वाजवून व गुढयांची उभारणी करूण चालावे त्यातून व्यक्तीना सामाजिक बळ प्राप्त होते हे दिसते. 'किर्तनी सांगती अनूभव गोष्टी ! परि धन कांता दुष्टी त्याग नव्हे !!' चोखोबांनी वैराग्यवृत्तीवर कडक शब्दात तासेरे ओढले आहेत. किर्तनात संत मंडळी सांगतात परंतू वैराग्य जिवनात धन

आणि पत्नी (बायको) यांचा लाड करतात. कारण धन प्रलोभनाचे केंद्र असून कांता ही वैराग्यात्मा रसातळाला नेणारी प्रवृत्ती आहे, त्यामुळे धन आणि कांता वैराग्य जिवनात फार घातक असतात हे स्पष्ट होते. यातून सामाजिक दृष्टीकोण जागृत होते.

जगामध्ये दिसे बरे की वाईट!
ऐसाचि बोभाट करीन देवा !!

संत चोखोबा तत्कालिन परिस्थितीला न जुमानता विठ्ठलाजवळ स्पष्ट शब्दात सांगतो की, माझ्या नजरेसमोर जे काही सत्य असत्य आहे ते मी समाजासमोर मांडायला घाबरनार नाही, कारण सत्य नेहमी सुर्यपकाशा ऐवढे स्पष्ट असते. त्यामुळे मला कशाचीही भिती नाही. यातून चोखेबाची वाणी म्हणजे तलवारीची धार आहे हे स्पष्ट होतो.

एकासी वैभव राज्याची पदवी !
एक गावोगावी भीक मागे !!
हाचि न्याय तुमचे दिसतोकी घरी !
चोखा म्हणे हरी कर्म माझे !!

संत चोखामेळा परमेश्वराकडे न्याय मागतांना म्हणतो की, हे परमेश्वरा तु सर्व सृष्टीचा निर्माता असून एकाला राजा व राजपाट देवून त्याचे वैभव वाढवतोस तर दुसऱ्याला असे गावोगावी, दारोदारी फिरायला का भाग पाडतोस अशा न्याय का बर करतोस. असा दुजाभाव पाहण्यासाठी माझे कर्म कारणीभूत आहेत का ? अस रोखठोक प्रश्न ते विचारतात. यातून त्यांचा समाजा विषयाचा प्रेम ओतप्रोद वाहताना दिसते.आदि अंती

अवघा विटाळ संचला !
सोहळा तो झाला कोण न कळे !!
जन्मता विटाळ मरता विटाळ !
चोखा म्हणे विटाळ आदि अंती !!

संत चोखोबा समाजासमोर विटाळाचे मूळ कारण शोधतांना मानवाचा देह हा पंचमहाभुतांनी बनला असून या पंचभूतांचा मेळ जगामध्ये नांदत असते. व्यक्ती जन्माला आल तरी विटाळ होते आणि मेलातरी विटाळ होतो, तर तो सोवळा केव्हा होतो. हे सांगता येत नाही. कारण मानसाचा देह विटाळातून शुध्द केव्हा झाला हे समाजाला पटवून देतांना व सांगतात की, अशा सोवळयांच्या नादी न लागता प्रत्येकाने शुध्द मनाने एकमेकांशी व्यवहार करावा हेच स्पष्ट होते. शेवटी परमेश्वराला क्षमा मागतांना ते म्हणतात,

''जोडोनिया कर चोखा विनविता देवा !
बेलिलो उत्तर परि राग नसावा !!
यातून चोखोबाची विनम्र भक्ती दिसून येते.

**प्रपंचातून परमार्थाकडे नेणारे संत :**

संत चोखामेळा यांनी आपल्या प्रापंचिक जीवनात अत्यंत काबाडकष्ट करून घरगृहस्तीला हातभार लावला. ते म्हणत 'हीन याती माझी देवा! कैसी घडे तुझी सेवा !!' यातून समाजातील जातीयवाद आणि त्यात येणाऱ्या अडचणी याची प्रचिती दिली. श्रम परिहारासाठी अभंग गाऊन समाजात माजणारी अराजकता मांडण्याचे काम त्यांनी केले. ते म्हणत 'माझा लागताची कर ! सिंतोडा घेताती करार !!' म्हणजेच माणसाला माणसाचाच स्पर्श झाला तरी अंगावर पाणी शिंपडून पवित्र झाल्याचे सोपस्कार करायचे. अशा जातीयतेच्या

जोखडात राहून समजाला एक नवी जाणिव देणारे थोर संत आहेत हे शिध्द होते. –पंढरीचे सुख नाही त्रिभवनी ! प्रत्यक्ष चक्रपाणी उभा असे !!' असा पंढरीचा महिमा गायिला आहे. आपल्या प्रपचासाठी अनेक ठिकाणी भ्रमंती चोखोबानी केली पण पंढरीच्या सहवासा सारखे दुसरे सुख नाही हे सिध्द होते.

**माणसात देव शोधनारा संत :**

संत चोखामेळा यांनी माणूस हा केंद्र बिदू माणून कुठल्याही गोत्राचा, जातीचा किंवा कितीही श्रीमंत असेल तर त्याच्यात भेदभाव करू नये, त्यांनी समान वागणूक द्यावी व त्याच्यातच देव जानावा यातून संत चोखामेळ्याची दृष्टी किती निर्मळ होती हे सिध्द होते.

विठोबाचा हार तुझे कंठी कैसा आला !
शिव्या देती म्हणती महारा देव बाटविला !!

जेव्हा चोखोबा भक्ती मार्गात लिन होते तेव्हा साक्षात विठ्ठल त्याच्या भक्तीवर प्रसन्न होवून आपल्या गळयातील वैजंतीमाळ चोखोबाच्या गळयात टाकतो तेव्हा सनातनी समाज त्याच्या विरोध करतो, आणि 'महार' म्हणून त्यांच्यावर जातियतेचा ठपका ठेवतो अस्पृष्य जातीच्या व्यक्तीने स्पृष्य जातीतील देवाला बाटविले असा आरोप केला जातो. तेव्हा प्रत्यक्ष विठ्ठल सुध्दा चोखोबाची पाठ थोपटतांना दिसतो. सर्व समाजातील लोकांना सांगत असेल की उचनिचतेत काही ठेवले नाही असे दिसून येते.

समाजावर आघात करतांना चोखोबा म्हणता ''माकाडाचे परि हालविती मान ! दावी थोरपण जगामध्ये !! ज्या पध्दतीने मदारी प्राण्यांना खेळवतो तसेच ते वर्तन करतात. त्या प्रामणे माकडा सारखे मान हलविणारे संत सुध्दा जनतेच्या पाप पुण्याचे निराकरण न करता आपली पोकळ महती जगा समोर मांडतात यातून हा सामाजिक दृष्टीकोण स्पष्ट होतो. त्यावर ते पुन्हा म्हणता 'माळा आणि मुद्रा दाविताती सोंग ! डोलविती अंग रंग नाही !!

जे साधू स्वत:च्या अंगावर माळा, भष्म, टिळे असे नानाविध सोंग करतात आणि आमच्या सारखे दुसरे साधूसंत नाहीत असा बडेजाव आनतात त्यात कुठलाही रंग नासतो यावरून असे स्पष्ट होते की समाजात पसरलेली साधवी प्रवृत्ती ही समाजासाठी फार घातक असते. तरी सुध्दा अंधभक्ती करणारे व्यक्ती त्याच्या बळी पडतांना दिसतात.

शुध्द चोखामेळा ! करी नामाचा सोहळा !!
मी यातीहीन महार ! पुर्वी निळाचा अवतार !!
कृष्ण निंदा घडली होती ! म्हणोनी जन्मप्राप्ती !!
चोखा म्हणे विटाळ आम्हा पूर्वीचे हे फळ !!

संत चोखामेळा नामाचा सोहळा अत्यंत शुध्द अंत:करणाने पार पाडतो मी जरी महार म्हणजे अस्पृश्य जातीत जन्माला आलो तरी हा महार पुर्वीचा निळास्वामीचा अवतार समजला जाते, कारण श्रीकृष्णाच्या निंदेतून महाराची जन्मप्राप्ती झाले असे प्रांजळ विचार चोखोबा व्यक्त करतो. यातून चोखोबा किती स्वच्छ मनाचे आहेत हे स्पष्ट होतो.

त्यावर चोखोबा समाजाला सामाजिक विचार देतात, 'जन्मोजन्मीचे तुम्ही सांगाती ! काहोमज घातिले भ्रान्ती !!काही मज घातिले भ्रांती !! समाजात अठरापगड जातीचे लोक जरी असले तरी ते जन्मोजन्मीचे एकमेकांचे सांगाती आहेत. त्यामुळे आपण सर्वासोंबत प्रेमाणे राहून बंधुभावर निर्माण करावा असा विचार समाजाला देतांना दिसतात.

**अभंगाच्या ओव्यातून सामाजिक विचार :**

संत चोखामेळा यांनी समाजात पसरलेली स्पृष्य—अस्पृष्यता व जातीय भेदभाव मांडतांना ते म्हणत, 'नाही देह शुध्द याति अमंगळ ! अवघे वोंगळ गुणदोष !!' करू जाता विचार अवघा अनाचार ! आणिक प्रकार काय बोलू !! वाणी नाही शुध्द धड न ये वचन ! धि:कारिती जन सर्व मज !! अंग संग कोणी जवळ न बैसे ! चोखा म्हणे ऐसे जीवित माझे !! कोणीही अशुध्द किंवा अपवित्र नसतो. तर त्यांच्यातील गुणदोष बघून त्याला तसे महत्व दिले पाहीजे. संत चोखोबाचे अभंग लिहून घेणाऱ्या 'अनंतभट्टाच्या भाषेचे संस्कार, व्युत्पन्नता, बहुश्रृतता आणि कोणतीही सांस्कृतिक परंपरा पाठीसी नसतांनाही प्रांजळभावनेने काव्य निर्मिती करणारे कवी म्हणून समाजावर आघात केले आहेत. हे दिसून येते.

देहासी विटाळ म्हणती सकळ !
आत्मा तो निर्मळ शुध्द बुध्द !!

अशी समज चोखोबांनी समाजाला दिली. त्यावर त्यांनी 'जोहार मायबाप जोहार !
तुमच्या महारांचा मी महार !!'

असे रूपकात्मक अभंगही लिहून दलितांवर झालेल्या अन्यायाची चिड व्यक्त केली. आपल्या कवितेतून सामाजिक उपेक्षेची वेदना व्यक्त करणारे संत चोखामेळा हे मराठीतील व महाराष्ट्रातील पहिले दलितकवी आहेत. त्यांच्या काव्य निर्मितीची प्रेरणा जशी आध्यात्मिक तशी सामाजिकही आहे. संतांच्या अभंगवाणीतील अनुभवाची कक्षा चोखेबाच्या कवितेने रूंदावली हे स्पष्ट होते.

संत चोखामेळा म्हणतात, 'चोखा म्हणे एका घासाची चाकरी ! करीतो मी द्वारी तुमचीया !!' सनातनी समाजव्यवस्थेकडून हीनदीन समजल्या जाणाऱ्या लोकांची कशी शारिरीक व मानसिक पिडवणूक करून त्यांना भाकरी साठी चाकरी करावी लागते. त्याशिवाय समाजात स्थान नाही कदाचित संत चोखोबांनी सामाजिक स्वातंत्र्यासाठी बंड करण्याची उर्मी त्यांच्या मनात केली असावी असा आशावाद व्यक्त केला आहे.

अशा कारकिर्दीत संत चोखामेळा यांचा अंतकाळ इ.स. १३३८ सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा येथे झाला. त्यावेळी चोखोबांच्या सर्वांगातून विठ्ठलभक्तीचा सूर ऐकायला यायचे असे तत्कालिन महिपती सांगतात. तेव्हा त्यांचे गुरू संत नामदेवांनी पंढरीला विठ्ठलाच्या पायरीचा दगड म्हणून संत चोखाबांची समाधी बांधली यावरून असे दिसते की, महाराष्ट्रात पायरीचे दगड तीन मानले जातात. एक 'नामदेव पायरी, दुसरी चोखोबा पायरी ह्या दोन्ही पायऱ्या भक्तिच्या पायऱ्या म्हणून ओळखल्या जातात. तर तिसरी पायरी ही रायगडाची 'हिरोजी इंदूलकर' यांची त्यावर 'सेवेचा ठायी तत्पर ! हिरोजी इंदुलकर !!' असी नाममुद्रा कोरली आहे.

संत चोखोबानी आपल्या भक्ताला भेदभावाचे अर्थ अगदी साध्या सोप्या पध्दतीने जनसामान्य मानसाला समजावून देतात. 'भेदा भेद कर्म न कळे त्याचे वर्म ! वाऊगाचि श्रम वाहता जगी !! अशा बहुजन समाजातील लोंकाना कोणत्याही गोष्टीचे ज्ञान कळल्याशिवाय त्यांनी त्या प्रवृत्तीचा स्विकार करू नये असा घनाघाती प्रहार समाजावर केला. जनतेला सर्व कळते पण वळत नाही. कारण विनाकारण मानसिक श्रम करून आपल्या मनाला पिळा देतात.

चोखोबांनी समाजात पसरलेल्या अनिष्ठ प्रथेवर आघात केला आहे. ते म्हणतात. उपवास पारणे आणि धुम्रपान ! सुख समाधान नव्हे तेणे !! समाजात अनेक प्रकाचे जाती, धर्म, वंशाचे लोक राहतात. त्यांचे सोहळे सुध्दा वेगवेगळे असतात त्यात पसरलेले धुम्रपान मद्यपान हे समाजासाठी किती घातक असतात. हे समाजाला पटवून दिले त्यातून त्याचा समाजा विषयीचा कळवळा दिसून येतो.

बहूमत ग्रंथ करिता पठण !
सुख समाधान नव्हे तेणे !!

सामाजिक जिवन जगत असतांना समाजात प्रशिध्द पावलेले व जनसामन्याच्या मनात ठसणारे ग्रंथाचे नुसते पाठांतर केले तर त्यातील गांभिर्य समाजापर्यत पोहचणार नाही, किंबहुना त्यांना कळणार नाही. म्हणून चोखोबांनी पाठांतरा ऐवजी समजावून सांगण्यावर भर दिला. त्याशिवाय मानसिक सुख मिळनार नाही. याची जाणिव त्यांना होती. त्यासाठी ते समाजातील लोकांना पटवून देत होते. यातून त्यांचा मोठेपणा दिसून येते हे परखडपणे सांगावेसे वाटते

संत चोखामेळा समाजातील लोकांना माणूस, जात, आणि धर्म संपत्ती जोडायला शिका असा सल्ला देतात,

जात वित्त गोत न पाहेची काही !
घालावी ही पायी मिठी उगी !!

संत चोखोबा यांनी समाजाला एक नवी दिशा मिळवून देवून सामाजीक भान ठेवण्याचे कार्य केले असे स्पष्ट होते.

**निष्कर्ष :**

चोखामेळा संतपरिवारातील दलितसंत तत्कालिन परिस्थितीला अनुसरूण समाजातील विषमता दुर करणारे संतकवी, रूढी, कर्मकांड यावर आघात करणारे आधुनिक संत विठ्ठलभक्तीत रममान होऊन ‘चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा ! काय भुललासी वरलीया रंगा !! असा मौलिक संदेश देणारे सामाजिक कवी आहेत.

‘अवघ्या साधनांचे सार ! रामकृष्ण हा उच्चार !!’ अशी आध्यात्मिकतेची जोड देणारे आध्यात्मिक कवी म्हणन समाजासमोर येतात. यावरून हे सिध्द होते की संत चोखोबा सामाजिक जान ठेवणारे संत आहेत. हे नाकारता येत नाही. संत चोखामेळा यांनी समाजात पसरलेल्या रूढी, परंपरा, सोवळे ओवळे, अंधश्रध्दा आणि व्यसनाधिनता यावर आघात करून एक नवा पायंडा निर्माण व्हावा या हेतूने प्रेरित होऊन काव्य लेखन केले आहे. व येणाऱ्या पिढीला नवी प्रेरणा मिळेल ही आशा मी व्यक्त करत आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


- ल.रा. नसिराबादक : मराठी वाङ्:मयाचा इतिहास, दुसरी आवृत्ती पृ. ४२३
- अ. ना. देशपांडे : प्राचिन मराठी वाड्मयाचा इतिहास, उत्तरार्ध भाग एक पृ १६७
- गं.बा. सरदार : संत वाड्मयाची सामाजिक फलश्रृती, आवृत्ती तिसरी, पृ १७
- संत चोखामेळा अभंग गाथा, सप्तर्षी प्रकाशन मंगळवेढा.